

# विषय : इतिहास परीक्षेची पूर्व तयारी

**राहुल परब, शाळा :** महात्मा गांधी विद्यामंदिर, वांद्रे (पू)

विद्यार्थी मित्रांनो,

आता तुम्ही कसोटीच्या अंतिम टप्प्यात आहात. यशस्वी भव ! च्या मान्यवर तज्ज्ञ मार्गदर्शकांकडून वर्षभर तुम्हाला मार्गदर्शन मिळाले आहे. या मार्गदर्शनाचा लाभ घेतल्यामुळे तुमची शैक्षणिक वाटचाल यशस्वी झाली असेलच. या मालिकेमधून यापुढे परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी प्रश्नपत्रिका, तसेच प्रश्नपत्रिका व त्याची नमुना उत्तरे आणि मौखिक काम कसे करावयाचे आहे याबद्दल मार्गदर्शन करणार आहोत.

---

**वेळ : 2 तास** **गुण- 40**

**प्र. 1 (A) खालील विधानांपुढे कंसात दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय रिकाम्या जागी लिहून विधाने पूर्ण लिहा.** (3)

1) युरोपबाहेर ------- अल्पावधीत एक उद्योगप्रधान अर्थव्यवस्था म्हणून नावारूपास आली.
(चीन, अमेरिका, ऑस्ट्रेलिया)

2) आफ्रिकेला -------- असे म्हटले जाई.
(गुलामांचा देश, काळे खंड, मागासलेला प्रदेश)

3) रशियाने समाजवादी राष्ट्रांशी -------- लष्करी करार केला.
(बर्लिनचा, वॉर्साचा, मॉस्कोचा)

**(B) `A' गटातील बाबींशी `B' गटातील बाबींच्या योग्य जोड्या जुळवा** (3)

| `A' | `B' |
|---|---|
| 1) थॉमस जेफरसन | a) राष्ट्रसंघाचे मुख्यालय |
| 2) माईन काम्फ | b) अमेरिकन संघराज्याचा राष्ट्राध्यक्ष |
| 3) जिनिव्हा | c) नाझी पक्षाचे तत्त्वज्ञान |
| | d) अमेरिकेच्या स्वातंत्र्याचा जाहीरनामा |

**प्र. 2. खालील प्रश्नांची सुमारे 20 ते 25 शब्दांत उत्तरे लिहा (कोणतेही दोन)** (4)

1) `क्रांती' म्हणजे काय हे स्पष्ट करा.
2) बंगाल प्रांतात इंग्रजांनी दिवाणी हक्क कशा रीतीने मिळविले ?
3) निहिलिस्टांनी रशियातून पलायन का केले ?

**प्र. 3. खालील विधानांची प्रत्येकी 20 ते 25 शब्दांत कारणे लिहा (कोणतेही दोन)** (4)

1) इटली व जपान ही राष्ट्रे असंतुष्ट झाली.
2) अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष वुड्रो विल्सन यांनी जागतिक संघटना स्थापन करण्याची दोस्त राष्ट्रांना गळ घातली.
3) जागतिकीकरण म्हणजे नववसाहतवाद असे समीकरण झाले आहे.

**प्र. 4 खालील प्रश्नांची प्रत्येकी 40 ते 50 शब्दांत उत्तरे लिहा (कोणतेही दोन)** (6)

1) माँटेस्क्यूचा सत्ताविभाजनाचा सिद्धांत स्पष्ट करा.
2) राष्ट्रीय सभेची उद्दिष्टे कोणती होती ?
3) भारताचे अणू, अवकाश आणि संगणकाच्या जगात कोणते योगदान आहे ?

**प्र. 5 खालील प्रश्नांची सुमारे 80 ते 100 शब्दांत उत्तरे लिहा (कोणतेही दोन)** (8)

1) अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धाचे परिणाम लिहा.
2) पुढील मुद्द्यांच्या आधारे बाल्कन समस्येविषयी माहिती लिहा.
   i) भौगोलिकदृष्ट्या महत्त्व
   ii) रशियाचा हस्तक्षेप
   iii) इंग्लंड व फ्रान्सचा हस्तक्षेप
   iv) ऑस्ट्रियाचा हस्तक्षेप.
3) आफ्रिका खंडामध्ये निर्वसाहतीकरण कशा प्रकारे झाले ?

**प्र. 6 खालील विधानांपुढे दिलेल्या कंसातील पर्यायांपैकी योग्य पर्याय रिकाम्या जागी लिहून विधाने पूर्ण करा.** (2)

1) कायद्याच्या कच्च्या मसुद्याला ------- म्हणतात.
(विधेयक, ठराव, अध्यादेश)

2) सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश वयाची ------ वर्षे पूर्ण केल्यानंतर निवृत्त होतात.
(60, 65, 62)

**प्र. 7 खालील प्रश्नांची सुमारे 20 ते 25 शब्दांत उत्तरे लिहा (कोणतेही दोन)** (4)

1) लोकसभेच्या कार्यकालाविषयी माहिती लिहा.
2) महापौरांची कामे कोणती?
3) जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीत कोणाचा समावेश असतो?

**प्र. 8 खालील विषयांवर सुमारे 25 ते 30 शब्दांत टिपा लिहा. (कोणतेही दोन)** (4)

1) संसदेचे आर्थिक अधिकार
2) केंद्रीय मंत्रिमंडळाची निर्मिती
3) महानगरपालिकेची ऐच्छिक कामे.

**प्र. 9 खालील विधानांची सुमारे 25 ते 30 शब्दांत उत्तरे लिहा (कोणतेही एक)** (2)

1) पंतप्रधानांना परराष्ट्र धोरणाचे मुख्य प्रवक्ते का मानले जाते?
2) कटक मंडळ कसे स्थापन केले जाते?

**उद्याचा विषय : मराठी**

लोकसत्ता यशस्वी भव ! दहावी अभ्यास मालिका

**संपर्क :** yashasvibhava2007@gmail.com






तुम्हाला हे माहीत होतं का ?
पाणी दूषित करणारे घटक पाण्यात काही वर्षांपूर्वी जितके असायचे त्यापेक्षा हल्ली ते जास्त आढळतात.

फक्त ॲक्वागार्ड टोटल द्वारे शिसं, किटकनाशकं, रसायनं, क्लोरीन आणि पाणी दूषित करणाऱ्या अन्य सर्व माहीत असणाऱ्या घटकांपासून पिण्याचं पाणी मुक्त राहील ह्याची हमी मिळवा.

Aquaguard TOTAL™
WATER PURIFICATION SYSTEMS
हे जल अमृत आहे · जीवन आहे · धन आहे

फ्री होम डेमोसाठी 56006 ला ''AG'' SMS* करा.
फोन: 098210 48777, 3988 3333
आम्हाला www.eurekaforbes.com येथे विजिट करा

EUREKA FORBES Your friend for life

*स्पेशल SMS रेट्स लागू.

TRITON/08/EFL/131 MAR